# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४

# शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा – २०२५

## <u>प्रसिद्धी निवेदन</u>

संदर्भ:- १. शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.९२/टिएनटी-१, दि. २८/०२/२०२५.

२. मा. आयुक्त (शिक्षण), यांचे पत्र जा.क्र. आस्था-क/प्राथ १०६/टेट-३/वेप/२०२५/११९१, दि. १९/०३/२०२५

३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मरापप/बापवि/TAIT/२०२५/२०८७, दि. २५/०४/२०२५

४. या कार्यालयाची अधिसूचना जा.क्र. मरापप/बापवि/TAIT/२०२५/२०८८, दि. २५/०४/२०२५

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.९२/टिएनटी-१, दि.२८/०२/२०२५ व मा. आयुक्त (शिक्षण), यांचे जा.क्र.आस्था-क/प्राथ १०६/टेट-३/वेप/२०२५/११९१, दि. १९/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येत आहे. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्याची मुदत दि. १०/०५/२०२५ होती परंतु B.Ed. व M.Ed., महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षेस प्रविष्ठअसलेल्या विध्यार्थी/उमेदवारांच्या मागणीनुसार संधी देण्याविषयी शासनाकडून निर्देश प्राप्त होते. त्यामुळे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी त्यांना दि. १४/०५/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर परीक्षेस एकूण २२८८०८ परीक्षार्थी/उमेदवार प्रविष्ठ झाले आहेत.

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५ परीक्षा घेण्याचे आयोजन दि. २४/०५/२०२५ ते दि. ०५/०६/२०२५ या कालावधीमध्ये प्रस्तावित होते. त्याअनुषंगाने B.Ed. व M.Ed., महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षेस प्रविष्ठ असणाऱ्या विद्यार्थी /उमेदवारांचा परीक्षा कालावधी, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५ परीक्षेच्या कालावधीत नियोजित असेल तर अशा विद्यार्थी/उमेदवारांनी आपली माहिती विहित नमुन्यात परीक्षा परिषदेने दिलेल्या https://mscepune.in/DTEDOLA/TAIT2025Info.aspx या लिंकद्वारे भरणेबाबत सूचित केले होते. सदर लिंकवरील माहिती भरण्याची मुदत १४/०५/२०२५ होती तथापि सदर मुदत दि. १४/०५/२०२५ ऐवजी दि. २१/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती व तसे प्रसिद्धी निवेदन देण्यात आले होते. सदर भरलेली माहिती खालील तक्त्यामध्ये नमूद केलेली आहे.

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षेची माहिती भरलेल्या उमेदवारांची संख्या |
|---|---|---|
| 1. | D.El.Ed. | 452 |
| 2. | B.Ed. | 1317 |
| 3. | M.Ed. | 105 |
| 4. | MPSC | 1626 |
| 5. | OTHER | 2391 |
| **6.** | **Total** | **5891** |

अशा एकूण ५८९१ उमेदवारांची माहिती परीक्षा घेणाऱ्या गोपनीय संस्थेस दि. २१/०५/२०२५ रोजी सायंकाळी ०६:५० वा. ई-मेलद्वारे माहिती देण्यात आली आहे.. त्यानंतर परीक्षा परिषदेच्या msce.tait2025@gmail.com ईमेल वर दि. २२/०५/२०२५ रोजी सकाळी ११:१५ पर्यंत प्राप्त झालेल्या एकूण १८ परीक्षार्थी/उमेदवारांची माहिती परीक्षा घेणाऱ्या गोपनीय संस्थेस दि. २२/०५/२०२५ रोजी सकाळी ११: ३० वा. ई-मेलद्वारे देण्यात आली. या माहितीपैकी ज्या उमेदवारांनी परिपूर्ण व अचूक माहिती दिलेली आहे त्यांची माहिती विचारात घेऊन शक्य तेवढे बदल संबंधित संस्थेकडून करण्यात आलेले आहेत.

तरी उमेदवारांनी वर दिलेल्या लिंकद्वारे विहित मुदतीत माहिती सादर न केल्यास व उमेदवार परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल असेही कळविण्यात आले होते. त्यानुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२५ परीक्षा घेण्याचे नियोजन दि. २७/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५ व ०२/०६/२०२५ ते ०५/०६/२०२५ या कालावधीत करण्यात आलेले आहे. सदर परीक्षेचे प्रवेशपत्र दिनांक २४/०५/२०२५ रोजी उमेदवारांना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : २५/०५/२०२५**